अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 16 जुलै 2026 | वर्ष 11 वे | अंक 49 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## इंजिनचा कबाडा, मायलेजचा फज्जा अन् प्रतिलिटर १० रूपयांची लूट

### इथेनॉल मिश्रणाचा 'महाझोल'

### शेतकरी फायद्याच्या नावाखाली फक्त कारखानदारांची चांदी

**इथेनॉल धोरणामुळे शेतकऱ्यांची आर्थिक भरभराट होईल, अशी स्वप्ने सरकारकडून दाखवली जात आहेत. मात्र, साखर कारखानदारीचा पूर्वेतिहास पाहिला तर यात काडीचेही तथ्य नसल्याचे स्पष्ट होते. देशातील साखर कारखानदारांकडे शेतकऱ्यांच्या हक्काच्या एफआरपीची हजारो कोटी रुपयांची रक्कम थकीत आहे. तोडणी, वाहतूक आणि इतर कपाती वजा करून ३५०० रुपयांच्या एफआरपीऐवजी शेतकऱ्यांच्या हातात केवळ २५०० रुपये पडतात. साखर कारखाने देशी-विदेशी दारू, इथेनॉल, आणि बगॅसपासून वीज बनवून करोडोंचा नफा कमावतात. मात्र, या उपपदार्थांच्या नफ्यातील एक छदामही शेतकऱ्याला दिला जात नाही. भारतात 'शेतकरी कल्याण' हा शब्द वापरला की कोणत्याही योजनेला विरोध होत नाही, नेमक्या याच भावनिक राजकारणाचा गैरफायदा घेत बडी 'इथेनॉल लॉबी' आणि कारखानदार स्वतःची घरे भरत आहेत. कमी दर्जाचे इंधन वापरायचे, मायलेज घटल्याचा तोटा सोसायचा, वाहनांच्या दुरुस्तीचा भुर्दंड सोसायचा आणि तरीही किंमत मात्र उच्च दर्जाच्या पेट्रोलची मोजायची! सरकारने या चहूबाजूनी होणाऱ्या लुटीची दखल घेऊन 'मिश्रित पेट्रोल'चे दर तातडीने कमी करावेत, अन्यथा जनतेचा हा संताप रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही.**

ब्रम्हपुरी/का.प्र.

कच्च्या तेलाची आयात कमी करणे आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या नावाखाली केंद्र सरकारने देशभरात २० टक्के इथेनॉल मिश्रित (E20) इंधनाची सक्ती तर केली, मात्र या धोरणामुळे देशातील कोट्यवधी वाहनधारक आणि सामान्य जनता मात्र चहूबाजूंनी नागवली जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. २०२२ मध्ये पेट्रोलमध्ये १० टक्के असलेले इथेनॉलचे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढवून चालू आर्थिक वर्षात २० टक्के करण्यात आले आहे. मात्र, या निर्णयामुळे वाहनांचे होणारे नुकसान, मायलेजमध्ये झालेली घट आणि किमतींमधील उघड लूट यावर मात्र सरकार आणि वाहन कंपन्यांनी 'मौन' बाळगले आहे. 'शेतकऱ्यांचे कल्याण' हा केवळ एक भावनिक मुखवटा असून, त्याआड ग्राहकांची लूट आणि बड्या कारखानदारांचे उखळ पांढरे करण्याचे काम पद्धतशीरपणे सुरू असल्याचे चित्र आहे.

सध्या बाजारात शुद्ध पेट्रोलचे दर ११२ रुपये प्रति लिटरच्या घरात आहेत, तर उसाचा रस, मका, तांदूळ यांपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा सरासरी दर प्रतिलिटर केवळ ६३.४१ रुपये इतका आहे. २० टक्के इथेनॉल मिश्रित इंधनाच्या १ लिटरच्या बाटलीत प्रत्यक्षात काय असते आणि त्याची खरी किंमत किती असावी, याचे गणित खालीलप्रमाणे आहे:

शुद्ध पेट्रोल ८०० मि.लि. किंमत ८९.०६ रुपये, इथेनॉल (सरासरी दर) २०० मि.लि. किंमत

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## पाणीटंचाई, सिंचन, आरोग्य व विकासकामांवर आमसभेत सखोल आढावा

### आम. वडेट्टीवारांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर, ८ दिवसांत उपाययोजना करण्याचे निर्देश

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रातील विकासकामांना गती देण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी ब्रम्हपुरी तालुकास्तरीय आमसभेचे आयोजन विठ्ठल-रुख्मिणी सभागृहात करण्यात आले. राज्याचे माजी मंत्री तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध शासकीय विभागांच्या विकासकामांचा सर्वंकष आढावा घेण्यात आला. यावेळी नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर तत्काळ निर्णय घेत अधिकाऱ्यांना कठोर शब्दांत सूचना देण्यात आल्या.

बैठकीची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि स्वच्छतादूत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने झाली. गटविकास अधिकारी तुषार दांडगे यांनी प्रास्ताविक करत मागील आमसभेतील निर्णयांच्या अनुपालनाचा अहवाल सादर केला. त्यानंतर ग्रामीण पाणीपुरवठा, पाणी व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम विभाग,



पंचायत राज, कृषी, पशुसंवर्धन, वन, आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, महावितरण, ग्रामीण गृहनिर्माण, राष्ट्रीय ग्रामीण जीवोन्नती अभियान तसेच विविध विभागांच्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

आमसभेला तालुक्यातील सरपंच, ग्रामपंचायत प्रशासक, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या गावातील रस्ते, वीज, पिण्याचे पाणी, आरोग्य, शिक्षण आणि इतर मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न थेट आमदार विजय वडेट्टीवार यांच्यासमोर मांडले. प्रत्येक समस्येची गंभीर दखल घेत वडेट्टीवार यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश दिले.

आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले, 'विकासकामांच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून निश्चित मुदतीत कामे पूर्ण करावीत. शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे आणि नागरिकांना कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागू नयेत.'

या महत्त्वपूर्ण बैठकीला तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा. राजेश कांबळे, प्रमोद चिमुरकर, थानेश्वर कायरकर, निलकंठ माणापुरे यांच्यासह जि.प.च्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, प्रकल्प संचालक मंजीरी टकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अतुलकुमार गायकवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, कार्यकारी अभियंते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सभेचे संचालन विस्तार अधिकारी मिलिंद कुरसुंगे यांनी केले, तर आभार सहा. बीडीओ रविंद्र घुबडे यांनी मानले. या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे तालुक्यातील विकासकामांना नवी दिशा आणि गती मिळेल, असा विश्वास उपस्थित नागरिकांनी व्यक्त केला.



संपादकीय...

# विरोधी पक्ष आणखी कमकुवत!

महाराष्ट्र विधान परिषदेतील पाच सदस्यांचा कार्यकाळ प्रत्यक्षात डिसेंबरमध्ये संपणार असला, तरी पावसाळी अधिवेशनातच त्यांना निरोप देण्यात आला. कारण हिवाळी अधिवेशनाच्या आदल्या दिवशी त्यांचा कार्यकाळ संपणार आहे. हा केवळ संसदीय औपचारिकतेचा भाग असला, तरी त्यातून पुढील राजकीय वास्तवाची चाहूल मिळते. हिवाळी अधिवेशन सुरू होईल तेव्हा विधान परिषदेतील सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संख्यात्मक दरी आणखी वाढलेली असेल. मात्र हा प्रश्न केवळ आकड्यांचा नाही; तो राज्यातील लोकशाहीच्या दर्जाशी निगडित आहे. सध्या विधान परिषदेच्या ७८ जागांपैकी पाच राज्यपाल नियुक्त जागा रिक्त आहेत. कार्यरत ७३ सदस्यांपैकी महायुतीकडे तब्बल ५५ सदस्यांचे संख्याबळ आहे. त्यात भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांचा समावेश आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीकडे केवळ १५ सदस्य उरले आहेत. विरोधी पक्षातील सदस्यांची संख्या कमी असणे ही एक बाब असली, तरी त्या सदस्यांपैकी अभ्यासू, आक्रमक आणि सरकारला तथ्यांच्या आधारे प्रश्न विचारणाऱ्या आमदारांची संख्या आणखी कमी होत असल्याची वस्तुस्थिती अधिक चिंताजनक आहे.

काँग्रेसचे आमदार अभिजीत वंजारी यांच्या कार्यकाळाची समाप्ती ही त्याच दृष्टीने महत्त्वाची घटना आहे. सभागृहात सरकारला केवळ राजकीय आरोपांनी नव्हे, तर आकडेवारी, धोरणे आणि कायद्यांच्या आधारे घेरणारे सदस्य म्हणून त्यांनी आपली वेगळी छाप निर्माण केली होती. त्याआधी सचिन अहिर यांनी शिवसेना (शिंदे) पक्षात प्रवेश केल्याने विरोधी फळीला धक्का बसला होता. या घडामोडींमुळे विरोधकांची केवळ संख्या नव्हे, तर त्यांची प्रभावी उपस्थितीही कमी झाल्याची चर्चा सुरू आहे. मजबूत सरकारइतकाच सक्षम विरोधी पक्षही लोकशाहीचा अपरिहार्य घटक असतो. विरोधी पक्षाचे काम सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करणे नसते, तर त्या निर्णयांची चिकित्सा करणे, त्रुटी दाखवून देणे, पर्याय सुचवणे आणि लोकहिताचे प्रश्न सातत्याने उपस्थित ठेवणे हे त्यांचे मूलभूत कर्तव्य असते. सरकारची उत्तरदायित्वाची भावना टिकवून ठेवण्याचे कामही विरोधी पक्षच करत असतो.

विधान परिषद हे राज्याचे वरिष्ठ सभागृह म्हणून ओळखले जाते. या सभागृहाकडून तात्कालिक राजकारणापेक्षा धोरणात्मक आणि सखोल चर्चेची अपेक्षा असते. अनेकदा विधानसभेतील गदारोळापेक्षा विधान परिषदेत अधिक अभ्यासपूर्ण चर्चा झाल्याचे दिसून आले आहे, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, शिक्षक, पदवीधर मतदारसंघांतून निवडून आलेले सदस्य आणि अनुभवी राजकारणी यामुळे या सभागृहाला वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. अशा सभागृहात संख्येच्या जोरावर निर्णय होणे अपरिहार्य असले, तरी चर्चेची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी सक्षम विरोधी आवाज आवश्यक असतो. भारतीय संसदीय इतिहासात कमी संख्याबळ असूनही प्रभावी विरोधी पक्षाची अनेक उदाहरणे आहेत. अभ्यास, सातत्य, मुद्देसूद मांडणी आणि जनतेच्या प्रश्नांशी असलेली बांधिलकी यांच्या जोरावर अल्पसंख्य विरोधकांनी अनेकदा सरकारला अडचणीत आणले आहे. त्यामुळे आजही विरोधकांसमोर संधी संपलेली नाही. मात्र त्यासाठी सभागृहातील उपस्थिती, तयारी आणि समन्वय अधिक भक्कम करावा लागेल.

याचबरोबर राज्यपाल नियुक्त पाच जागा दीर्घकाळ रिक्त राहणे हेदेखील संसदीय प्रक्रियेसाठी योग्य नाही. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना सभागृहात स्थान देण्यामागील घटनात्मक उद्देशच त्यामुळे अपूर्ण राहतो. या जागा भरल्यास विधान, परिषदेतील चर्चांना अधिक वैचारिक समृद्धी मिळू शकते. विधान परिषदेतील बदलती राजकीय समीकरणे ही एका पक्षाच्या विजयाची किंवा दुसऱ्याच्या पराभवाची कथा म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. लोकशाहीची खरी ताकद ही सत्ताधारी आणि विरोधक या दोघांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. सरकार जितके सक्षम असेल, तितकाच सक्षम आणि सजग विरोधी पक्षही आवश्यक असतो. अन्यथा बहुमताचे बळ हळूहळू उत्तरदायित्वावर मात करू लागते आणि संसदीय चर्चेचे महत्त्व कमी होण्याचा धोका निर्माण होतो.

# सातत्यपूर्ण प्रयत्न आणि कठोर परिश्रम हेच एनसीसीच्या यशाचे रहस्य - प्राचार्य डॉ. शेकोकर




ब्रह्मपुरी/का.प्र.

ने. ही. महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नागपूर यांच्या वतीने भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून निवड होऊन यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या एनसीसी एक्स कॅडेट युसूफ चांदीकर, प्रसाद अजबाले आणि तन्मय जुआरे यांचा सत्कार कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रा. राहुल मोहूर्ले आणि कॅप्टेन कुलजीत कौर गिल उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना माजी कॅडेट युसूफ चांडीकर आणि प्रसाद अजबाले यांनी आपल्या यशाचे श्रेय एन. बी. एच. एज्युकेशन सोसायटीचे सचिव अशोक भैया, सदस्य गौरवजी भैया, महाविद्यालय प्रशासन आणि कॉलेज मधिल एन सी सी ट्रेनिंगला दिले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच एनसीसीच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास, शिस्त, नेतृत्वगुण आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारे वातावरण संस्थेने उपलब्ध करून दिल्यामुळे आणि एन सी सी अधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याची भावना कैडेट्सनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी एनसीसी केअरटेकर ऑफिसर प्रा. रेवनदास बोरकर यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. एन एच कॉलेज, २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नागपूर येथील एनसीसी अधिकारी कॅप्टन अभिजित परकरवार यांनी कैडेट्सचे अभिनंदन करून एनसीसीचे विविध उपक्रम, कठोर प्रशिक्षण, नेतृत्वगुण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील एनसीसीचे योगदान यावर सविस्तर मार्गदर्शन केले आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार यांनी एन सी सी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेमाची भावना प्रभावीपणे विकसित होत असून, हे गुण त्यांच्या भावी आयुष्यात निश्चितच उपयुक्त ठरणार आहेत असे मत व्यक्त करित एनसीसीच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सुबक सूत्रसंचालन कॅडेट प्रिया राऊत हिने केले, तर आभार कॅडेट संचिता नक्षिणे हिने मानले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.

# भव्य मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

## कर्मयोगी ॲड.पं. गणेशदत्त तिवारी यांच्या ४१ व्या स्मृतिदिनानिमित्य कार्यक्रम

ब्रह्मपुरी/का.प्र.

जनसेवेचे व्रत आयुष्यभर जपणारे कर्मयोगी ॲड. पं. गणेशदत्त तिवारी यांच्या ४१ व्या स्मृतिदिनानिमित्त ब्रह्मपुरी येथे भव्य निशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.



पेठ वॉर्ड येथील तिवारी यांच्या निवासस्थानी कर्मयोगी ॲड. पं. गणेशदत्त तिवारी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी ब्रह्मपुरी नगर परिषदेचे अध्यक्ष योगेश मिसार, नगरसेवक अविनाश राऊत, डॉ. स्वप्नील कवठे, प्रा. सुधा तिवारी, अजित तिवारी, संध्या मिश्रा, श्रीराम ज्योतिषी, पद्मा तिवारी, ज्येष्ठ पत्रकार प्रा. उमेशचंद्र मिश्रा, डॉ. विजय खंडारे, मेजर विनोद नरड, डॉ. खोकले, डॉ. मोहिनी कवठे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात ब्रह्मपुरी येथील अशोक नेत्रालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी एकूण १७६ नागरिकांची नेत्र तपासणी केली. तपासणीनंतर ३७ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. निवड झालेल्या रुग्णांना 'स्व. गणेशदत्त तिवारी सन्मान कार्ड' प्रदान करण्यात आले. या कार्डच्या माध्यमातून अशोक नेत्रालयात त्यांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया पूर्णपणे निशुल्क करण्यात येणार आहे. तसेच आवश्यक रुग्णांना मोफत औषधांचेही वितरण करण्यात आले.

## विनोदिनी

एक बाई आपल्या आवडीचा रुमाल बँक कॅश काऊंटरवर विसरून जाते. ज्या कुणाचा आहे तो घेऊन जाईल असा विचार करून कॅशिअर बाजूला ठेवून देतो... पण गडबडीत कॅशिअर कडून त्यावर २-४ स्टॅंप मारले जातात... काहीवेळानं ती बाई आपला रुमाल शोधत येते. कॅशिअर तिला रुमाल देतो, ती रुमालावर शिक्के बघते, रागाने कॅशियरला जाब विचारते... कॅशिअर पण चिडतो.... वादावादी वाढते आणि बाई चिडून तणतणत मॅनेजरच्या केबिन मध्ये जाऊन त्याला सगळं सांगते. मॅनेजर तिच्या कडून रुमाल मागून घेतो आणि त्यावर 'All stamps are cancelled' चा शिक्का मारून त्यावर आपली सही करून देतो..!!

# कोट्यावधी रूपयांचा धान खरेदी घोटाळा, ब्रम्हपुरीच्या व्यापाऱ्यांना गंडा

## देसाईगंज येथील दलालासह भंडारा येथील राईस मिल मालकावर गुन्हा दाखल

ब्रम्हपुरी/का.प्र.

जास्त भावाचे आमिष दाखवून आणि विश्वास संपादन करून स्थानिक धान व्यापाऱ्यांची कोट्यवधी रुपयांनी फसवणूक केल्याचा खळबळजनक प्रकार ब्रम्हपुरी येथे उघडकीस आला आहे. देसाईगंज येथील एका धान्य दलालाने भंडारा येथील 'केएमसी राईस इंडस्ट्री'च्या मालकांशी संगनमत करून अऱ्हेरनवरगाव (ता. ब्रम्हपुरी) येथील तीन मोठ्या धान्य व्यापाऱ्यांचे तब्बल २ कोटी १५ लाख ४५ हजार ३७७ रुपये हडप केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी मुख्य तक्रारदार नंदकिशोर नामदेव वैद्य (रा. अऱ्हेरनवरगाव) यांच्या लेखी रिपोर्टवरून ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१६(२), ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार नंदकिशोर वैद्य हे अऱ्हेरनवरगाव येथे आपल्या पत्नीच्या नावाने 'साई कृषी केंद्र' चालवून धान खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. देसाईगंज येथील 'तेजस ट्रेडर्स'चे मालक व दलाल सुनील टोलाराम रामनानी (वय ४५) यांच्याशी वैद्य यांचे मागील ७-८ वर्षांपासून व्यावसायिक संबंध होते. सन २०२५ मध्ये सुनील रामनानी याने ब्रम्हपुरीपेक्षा जास्त भाव मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि शिंगोरी (भंडारा) येथील कुरेशी ब्रदर्स यांच्या 'केएमसी ग्रेन मिलिंग अँड प्रोसेसिंग युनिटमध्ये माल पाठवण्यास सांगितले. सुरुवातीला काही महिने व्यवहार सुरळीत करून रामनानीने वैद्य यांचा पूर्ण विश्वास संपादन केला.

यावर्षी जून महिन्यात रामनानी याने पुन्हा माल पाठवण्यास सांगितले. मात्र, नेहमी १५ दिवसांत मिळणारे पेमेंट यावेळेस २ महिन्यांच्या साईटवर मिळेल असा मेसेज कंपनीने पाठवल्याने नंदकिशोर वैद्य यांना संशय आला. त्यांनी रामनानीकडे विचारणा केली असता, 'तू काळजी करू नको, पैशांची पूर्ण हमी माझी आहे. केएमसीचा ५० टक्के तांदूळ मीच विकतो, त्यामुळे तिथली सगळी एबीसीडी मला ठाऊक आहे,' असा शब्द रामनानीने दिला. दलालाच्या या शब्दावर विश्वास ठेवून वैद्य यांनी १० जून २०२५ ते ५ ऑगस्ट २०२५ दरम्यान एकूण २२ ट्रक धान (६००१.०५ क्विंटल) केएमसी मिलला पाठवले. एकूण रक्कम १,२९,९०,०३२/- रुपये होती.

मुदत संपल्यानंतरही पैसे न आल्याने व्यापाऱ्यांनी तगादा लावला. सुरुवातीला बँक लोनचे कारण सांगून टाळाटाळ करण्यात आली. १० सप्टेंबर २०२५ रोजी नंदकिशोर वैद्य हे अन्य एक व्यापारी विनोद कावळे यांच्यासह सुनील रामनानीच्या देसाईगंज येथील ऑफिसमध्ये गेले. तिथे हिशोब मागितला असता रामनानीने रंग बदलला आणि 'तुझा माल मी विकत घेतला काय? आता जास्त विचारले तर अंजाम बेकार होईल,' अशी धमकी दिली. त्यानंतर व्यापाऱ्यांनी थेट भंडारा येथील मिल गाठून संचालक मतीन अहमद गणी अहमद कुरेशी यांची भेट घेतली. त्यांनीही महिनाभराची मुदत मागितली. परंतु, ९ नोव्हेंबर २०२५ रोजी पुन्हा पैशांची विचारणा केली असता मतीन कुरेशी याने अत्यंत उद्धटपणे, 'पुन्हा तू माझ्या मिलला धान दे, मिल चालू राहील तरच तुझे जुने पैसे जिवंत राहतील. अन्यथा वाट बघत राहा, किंवा तुला जे जमेल ते कर, तेरे को जो उखाडणा है उखाड ले!' असे म्हणून व्यापाऱ्यांना हाकलून लावले. या संपूर्ण प्रकरणात दलाल सुनील रामनानी आणि मिल मालक कुरेशी यांच्यात मोठी गुप्त युती (साटेलोटे) असल्याचे उघड झाले आहे. २८ मार्च २०२६ रोजी व्यापाऱ्यांच्या 'KMC RECOVERY GROUP' या व्हॉट्सअॅप ग्रुपवर एक ७/१२ चा उतारा पोस्ट झाला. मतीन कुरेशी यांचा मुलगा शाहबाज उर्फ बंटी कुरेशी याने मौजा पावडदवणा (ता. मौदा, जि. नागपूर) येथील कोट्यवधी रुपयांची शेतजमीन दलाल सुनील रामनानीच्या नावे करून दिल्याचे त्या उताऱ्यावरून स्पष्ट झाले. २९ मार्च रोजी व्यापाऱ्यांनी देसाईगंज येथील ट्रॅक्टर शोरूममध्ये रामनानीला गाठून हा ७/१२ चा उतारा दाखवला. त्यावर रामनानीने जमीन लिहून घेतल्याचे मान्य केले, पण अत्यंत अश्लील भाषेत व्यापाऱ्यांना धमकावले. तसेच तिथल्या एका स्थानिक राजकारण्याला बोलावून 'कुरेशीचे मोठ्या गुंडांसोबत संबंध आहेत, त्याच्या नादाला लागू नका,' अशी धमकीवजा तंबी व्यापाऱ्यांना देण्यात आली.

८ एप्रिल २०२६ रोजी तक्रारदार केएमसी मिलवर गेले असता, तिथे त्यांच्यासारखेच फसवणूक झालेले महाराष्ट्रातील विविध भागांतील अंदाजे ८० व्यापारी हजर होते. तिथल्या संचालकांनी स्पष्ट सांगितले की, आता तुमची थकीत रक्कम देण्याची आमची लायकी उरलेली नाही. अऱ्हेरनवरगाव येथील फसवणूक झालेले एकूण व्यापाऱ्यांमध्ये नंदकिशोर नामदेव वैद्य यांचे २२ ट्रक, ६००१.०५ क्विंटल माल अंदाजे किंमत रु. १,२९,९०,०३२/-, विनोद वामनराव कावळे यांचे १३ ट्रक, १९४३.७० क्विंटल माल, अंदाजे किंमत रु. ७५,७०,८१६/- व रामदास हरिभाऊ जिभकाटे ०२ ट्रक, ४८१.३५ क्विंटल माल अंदाजे किंमत रु. १०,४४,५२९/- असे एकूण ३७ ट्रकमध्ये ८४२६.१० क्विंटल माल किंमत २,१५,४५,३७७/- रुपये हडप केले.

# ब्रम्हपुरी जिल्हा संघर्ष समितीकडून आमदारांचा जंगी सत्कार

## जिल्हा निर्मितीसाठी वडेट्टीवारांची विधानसभेत गर्जना



ब्रह्मपुरी/का.प्र.

विधानसभेच्या चालू पावसाळी अधिवेशनामध्ये माजी विरोधी पक्षनेते तथा स्थानिक आमदार विजय वडेट्टीवार यांनी 'ब्रह्मपुरी जिल्हा' निर्माण करण्यासाठी विधानसभेत अत्यंत आक्रमक व बुलंद आवाज उठविला. त्यांच्या या ऐतिहासिक आणि ठाम भूमिकेबद्दल 'ब्रह्मपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समिती' व परिसरातील नागरिकांच्या वतीने आमदार महोदयांचा पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार व अभिनंदन करण्यात आले तथा आभार मानण्यात आले.

प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या भूमिकेचे कौतुक केले. ते म्हणाले, 'आमदार साहेबांनी अधिवेशनात ब्रह्मपुरी जिल्हा झालाच पाहिजे, ही जी जोरदार मागणी केली ती अत्यंत कौतुकास्पद आहे. ब्रह्मपुरीसह नागभीड, सिंदेवाही, सावली आणि परिसरातील जनतेच्या सोयीसाठी व विकासासाठी ब्रह्मपुरी जिल्हा होणे अत्यंत आवश्यक आहे.' यापुढेही आमदार साहेब या मागणीचा असाच सातत्याने पाठपुरावा करतील, अशी अपेक्षा व्यक्त करत संघर्ष समितीतर्फे ब्रह्मपुरी शहरात ठिकठिकाणी त्यांच्या अभिनंदनाचे बॅनर लावण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

सत्काराला उत्तर देताना आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांनी जनतेला आश्वस्त केले. ते म्हणाले, 'मी विधानसभेमध्ये ब्रह्मपुरी जिल्हा निर्माण करण्याकरिता पहिल्यांदाच अत्यंत ठोस भूमिका घेतली आहे. जोपर्यंत ब्रह्मपुरीला जिल्ह्याचा दर्जा मिळत नाही, तोपर्यंत प्रत्येक अधिवेशनात मी यावर आवाज उठवल्याशिवाय राहणार नाही. ब्रह्मपुरी जिल्हा झाल्याशिवाय मी गप्प बसणार नाही.' याकरिता जे काही करावे लागेल ते सर्व प्रयत्न करणार, याकरिता काही नवीन तहसील तयार करावे लागतील त्या पण आपण करणार, तसेच, ब्रह्मपुरी परिसराचा सर्वांगीण विकास करणे हे माझे नेहमीच मुख्य उद्दिष्ट राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी प्राचार्य सुयोग बाळबुद्धे, प्रशांत डांगे, योगेश मिसार (नगराध्यक्ष), डॉ. नितीन उराडे (उपाध्यक्ष), प्रकाश खोब्रागडे (नगरसेवक), पुष्पांकर बांगरे (नगरसेवक) डॉ. बाळक्रिष्ण शेळके, लीलाधर झलके, शंकरराव उराडे, प्राचार्य डॉ. नामदेवराव कोकोडे, दत्तू टिकले, केशवराव करंबे, प्राचार्य डॉ. संजय हर्षे, खेमराज तिडके, गाजी पटेल यांच्यासह शेकडो नागरिक व समितीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैनगंगा विद्यालय कोलारी येथे मोफत स्कुल बॅग वाटप



ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक १०/०७/२०२६ रोज शुक्रवारला वैनगंगा विद्यालय कोलारी येथे स्व. अभिजित जगनाडे स्मृती प्रतिष्ठान ब्रम्हपुरी च्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ. देविदास जगनाडे सर उपस्थित होते तर विशेष अतिथी म्हणून प्रा. डॉ. नामदेव कोकोडे सर सचिव महात्मा फुले शिक्षण संस्था ब्रम्हपुरी उपस्थित होते व प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा. दिलीप जगनाडे व आशिष देविदास जगनाडे व सुवर्णा आशिष जगनाडे व ईशान आशिष जगनाडे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ईशान जगनाडे यांनी दुबई इथून इयत्ता १० वी मध्ये ९८.७० टक्के गुण संपादन करून पुढील इंजिनिअरिंगच्या शिक्षणासाठी सिंगापूर येथे निवड झाल्यामुळे संस्थेतर्फे त्यांचा शाल व मोमेंटो देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक धनंजय दाते सर तथा शिक्षक वृंद नागपुरे सर, कु. कोल्हे मॅडम, कु. प्रधान मॅडम, अवसरे बाबू, सुरेश देशमुख, रुपलाल रामटेके उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शन प्रा. डॉ. नामदेव कोकोडे सर, अध्यक्ष डॉ. देविदास जगनाडे सर यांनी आपल्या भाषणात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी काही अडचणी येऊ नये म्हणून हा उपक्रम मागील ८ वर्षापासून सुरु केला असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन नागपुरे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन कोल्हे मॅडम यांनी केले.

# गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांचा मोबदला व धान पिकाला पाणी सोडण्याकरीता तनय देशकरांचा पाठपुरावा

ब्रह्मपुरी/का.प्र.

गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तनय देशकर यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला असून, अधिग्रहित जमिनीचा प्रलंबित मोबदला लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हावा यासाठी त्यांनी मंत्रालयीन स्तरावरही पाठपुरावा सुरू केला आहे. तसेच गोसेखुर्द उजवा कालव्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेख साहेब यांची भेट घेऊन चर्चा केली.

या बाबत २३ एप्रिल रोजी तनय दादा देशकर यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीशजी महाजन यांची प्रत्यक्ष भेट घेऊन गोसेखुर्द नहरामधे जमिनी अधिग्रहित झालेल्या शेतकऱ्यांना मोबदला द्यावा यासाठी विनंती केली होती. काही तांत्रिक अडचणींमुळे हा विषय रेंगाळला



गेला. मात्र पुन्हा एकदा तनय देशकर यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री महाजन व माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन देत हा प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी विनंती केली आहे.

दरम्यान, यावर्षी कमी पावसामुळे धान पिकांवर पाण्याचे संकट निर्माण झाल्याने गोसेखुर्द प्रकल्प प्रशासनाची भेट घेऊन धरणातील पाणी तातडीने कालव्यात सोडण्याची मागणी केली. धान पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. देशकर यांच्या मागणीची दखल घेत गोसेखुर्द प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत पुढील आठवड्यात कालव्यात पाणी सोडण्याचे नियोजन करून शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला.

# परसोडी तुकूम येथील बोळीतील अतिक्रमण थांबवा

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील परसोडी( तुकूम) ग्रामपंचायत रामपुरी इथे गट नंबर १२ /१ व गट नंबर १२



/२ या बोळीच्या पोटामध्ये गैरअर्जदार भैया कचरू मेश्राम रा. परसोडी (तुकूम) ग्रामपंचायत रामपुरी याने मौजा परसोडी ( तूकूम) येथील शासकीय पट्टूयानुसार मागील पन्नास वर्षापासून शेती करिता शासकीय बोडीचे पाणी लागू असलेल्या बोडी मध्ये अवैधपणे अतिक्रमण केले आहे.

वरील शासकीय बोडीवर २०१९-२० मध्ये शासकीय निधी खर्चून इमारत दुरुस्ती झालेली आहे. यामध्ये दोन तुडुंब आणि बोडीला सिमेंट गोट्याचा सांडवा बांधलेला आहे. येथील बोडीच्या पाण्याने गट नंबर १३,१४,१५,१६,१७,१८,१९, २० ,२१, २२, २३, २४ शेतकऱ्यांना ५० वर्षापासून पाणी लागू असून या शेतमालकांचा उदरनिर्वाह गट नंबर १२/१ व गट नंबर १२/२ या बोडी च्या तुडुंबाद्वारे शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचत असते. पाण्याने व्याप्त शासकीय जमीन असून गैरअर्जदार भैया कचरू मेश्राम परसोडी (तुकुम) यांनी या बोडीच्या पोटात अवैध पने माती ढकलने, सिमेंट पोल गाडणे, बांद्या काढणे, धुरे तयार करणे हे कार्य केल्यामुळे मच्छिमार सोसायटी आणि शेतकऱ्यांकरिता पाण्याचा साठा कमी झाल्यामुळे भविष्यात गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकते. निस्तार हक्क असलेल्या वलीत धारक कास्तकारांना योग्य न्याय मिळवून द्यावा यासाठी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे .

निवेदन देतांना प्रा.प्रकाश बगमारे प्रदेश सचिव भाजपा ओबीसी मोर्चा यांचेससह सीतकुरा सोना ठाकरे, देविदास सीताराम ढोरे, हरबा सिताराम ढोरे, जितेंद्र श्रावण राऊत, सदाशिव सोमा ठाकरे, हीवराज सिताराम ढोरे, पंढरी सहारे, विजय निकोडे, श्रावण मेंगोजी ठाकरे, श्रीकृष्ण मेश्राम, जगदीश गोमा सहारे, गणेश दोनाडकर, संदीप राऊत यादी शेतकरी उपस्थित होते.

# क्रीडा संकुल ब्रम्हपुरी येथे भव्य वृक्षारोपण



ब्रह्मपुरी/का.प्र.

शहरातील मध्यभागी असलेल्या तालुका क्रीडा संकुल येथे दिनांक १० जुलै २०२६ ला सकाळी भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. देविदास जगनाडे तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.एन. एस. कोकोड, तालुका क्रीडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड, भाऊराव राऊत, वाडेकर सर महेंद्र मातेरे, यशवंत तलमले, ठेंगरी सर चंद्रगिरवार सर, प्रसिद्ध वृक्षमित्र सत्कारमूर्ती मनोहर वरवाडे, शेखर बनोरे, शंकरराव केळझरकर, गोविंद करंबे, बोधे सर ,करंबे सर उपस्थित होते यांप्रसंगी ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ब्रह्मपुरी व ने.ही. महाविद्यालय ब्रह्मपुरी चे शेकडो विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

वृक्षाचे महत्व त्याचे संगोपन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले व विद्यार्थ्यांच्या हस्ते गुलमोहर, अशोका, करंजी ,कडुलिंब, पिंपळ, वड, रेन ट्री, पाम, आंबा, निलगिरी, जांभूळ, चिकू, आवळा, शेवगा व इतर प्रकारच्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

संचालन राहुल जुआरे, प्रास्ताविक गोपाल भानारकर व आभार विहार लोखंडे यांनी मानले. सफलतार्थ रोहित बरडे, राजु बांगरे, कुंदाताई बांगरे, श्रीकांत कामडी, विठ्ठल करंबे यांनी परिश्रम घेतले.

# प्रतिबंधित तंबाखूचा साठा जप्त

## रूई येथील घटना, आरोपी फरार

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी तंबाखू व अन्नपदार्थांच्या छुप्या विक्री आणि साठवणुकीविरुद्ध ब्रम्हपुरी पोलिसांनी धडक मोहीम उघडली आहे. गुप्त माहितीच्या आधारे मौजा रूई येथील एका घरात छापा टाकून पोलिसांनी तब्बल ४६,३९५ रुपये किमतीचा प्रतिबंधित हुक्का शिशा तंबाखूचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी भानुदास मारोती चौधरी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार निलेश तुमसरे, स.पो.नि. मनोज खडसे व त्यांचे पथक पो.अं. प्रविण भिवगडे, इर्शाद खान, स्वप्नील पळसपगार, वशिष्ट रंगारी आणि म.पो.अं. चित्ररेखा हे हद्दीत अवैध दारू, जुगार व सुगंधी तंबाखू विरोधात पेट्रोलींग करत होते. दरम्यान, मौजा रूई येथील भानुदास चौधरी याने आपल्या घरात प्रतिबंधित सुगंधी तंबाखूची विक्रीसाठी साठवणूक केली असल्याची खात्रीशीर माहिती खबऱ्याकडून मिळाली. पोलिसांच्या पथकाने तातडीने दोन पंचांना सोबत घेऊन रूई गावाकडे कूच केली.

पोलीसांनी घराची झडती घेतली असता, घरातील स्टोअर रूममध्ये ४ प्लास्टिक चुंगळ्यांमध्ये लपवून ठेवलेला होला हुक्का शिशा तंबाखू १५ मोठे पॅकेट्स (७५ छोटे पाऊच), एकूण किंमत १९,८७५/- रुपये, मजा १०८ हुक्का शिशा तंबाखू ४ बॉक्सेस (४० टीन डब्बे), एकूण किंमत ११,४००/- रुपये, ईगल हुक्का शिशा तंबाखू (४० ग्रॅम) ९ पॅकेट्स (९० छोटे पाऊच), एकूण किंमत ७,६५०/- रुपये, ईगल हुक्का शिशा तंबाखू (२०० ग्रॅम) १८ पॅकेट्स, एकूण किंमत ७,४७०/- रुपये असा एकूण जप्त मुद्देमाल ४६,३९५/- रुपये किमतीचा सुगंधी तंबाखू प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला.

या प्रतिबंधित साठ्याबाबत विचारणा केली असता, आरोपीच्या आई-वडिलांनी आम्ही वयोवृद्ध असून घरीच राहतो, हा माल आमचा मुलगा भानुदास याचाच असून या व्यवहाराबाबत आम्हाला काहीही माहिती नाही, अशी कबुली पंचांसमक्ष दिली. स.पो.नि. मनोज खडसे यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून संपूर्ण माल जप्त केला. केमिकल अनॅलिसिस (C.A.Testing) साठी जप्त साठ्यातून ४ वेगवेगळ्या प्रकारांचे सॅम्पल घटनास्थळी सीलबंद करण्यात आले आहेत.

आरोपी भानुदास मारोती चौधरी (रा. रूई) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस)-२०२३ चे कलम २२३, २७५ आणि अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या कलम २६(२)(i), २६(२)(iv), ३०(२)(a), ५९ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सध्या आरोपी भानुदास चौधरी फरार असून, पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध आणि प्रतिबंधित तंबाखू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

# खरीप हंगामासाठी गोसेखुर्द कालव्यातून पाणी सोडण्याचा निर्णय

## आमदार विजय वडेट्टीवार यांच्या पाठपुराव्याला यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

खरीप हंगामाच्या तोंडावर पाण्याअभावी चिंतेत असलेल्या ब्रम्हपुरी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते तथा ब्रम्हपुरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे गोसेखुर्द प्रकल्पाच्या कालव्यातून शेतीसाठी पाणी सोडण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला असून, लवकरच कालव्यात पाणी प्रवाहित होणार आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर धान पिकाची लागवड केली जाते. सध्या रोवणीची कामे वेगाने सुरू असतानाच अपुऱ्या पावसामुळे अनेक भागांतील शेतकरी पाण्याच्या प्रतीक्षेत होते. धान पिकाच्या रोवणीपासून ते वाढीच्या टप्प्यापर्यंत पुरेशा पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन आमदार विजय वडेट्टीवार यांनी हा प्रश्न अत्यंत गांभीर्याने हाताळला. यासाठी त्यांनी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने पत्रव्यवहार केला. तसेच दूरध्वनीवरून थेट चर्चा करून ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांची सद्यस्थिती आणि पाण्याची निकड अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. गोसेखुर्द कालव्यातून तातडीने पाणी सोडले नाही तर धान रोवणीसह संपूर्ण खरीप हंगामावर परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी ठामपणे मांडले.

आमदार विजय वडेट्टीवार यांच्या या प्रभावी पाठपुराव्याची दखल घेत जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच गोसेखुर्द कालव्यातून शेतीसाठी पाणी सोडण्यात येईल, अशी ग्वाही दिली आहे. यामुळे ब्रम्हपुरी तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्रावरील धान पिकाला जीवनदायी पाणी मिळणार असून, खरीप हंगाम सुरळीत पार पडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार विजय वडेट्टीवार यांनी पुन्हा एकदा प्रभावी हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळवून दिल्याची भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# चकबोथली जि.प. शाळेला एलईडी टिव्ही भेट

## स्व. अनिल काटलाम स्मृतीप्रित्यर्थ

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चकबोथली येथे सामाजिक बांधिलकी जपत एक कौतुकास्पद छोटेखानी आणि भावूक कार्यक्रमाला काटलाम परिवारातील सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित



उपक्रम राबविण्यात आला. स्व. अनिल काटलाम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या स्मृती जीवंत ठेवण्यासाठी, काटलाम परिवाराच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची दारे खुली व्हावीत म्हणून एक भव्य एल.ई.डी. टीव्ही (LED TV) भेट देण्यात आली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि तंत्रज्ञानस्नेही शिक्षण मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या टीव्हीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दृकश्राव्य (Audio-Visual) पद्धतीने अभ्यासक्रम शिकणे अधिक सोपे आणि रंजक होणार आहे. उत्साही वातावरणात कार्यक्रम शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या या होते. यावेळी उपस्थितांनी स्व. अनिल काटलाम यांच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या समाजोपयोगी दृष्टिकोनाचे कौतुक केले.

शाळेला नवीन एल.ई.डी. टीव्ही मिळाल्यामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि उत्साह पाहायला मिळत होता. आता आपल्याला टीव्हीवर कार्टून्स, शैक्षणिक कविता, आणि विज्ञानाचे प्रयोग पाहायला मिळणार, या कल्पनेनेच मुले सुखावली होती. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने काटलाम परिवाराचे आभार मानण्यात आले. संपूर्ण परिसरात या दातृत्वाचे आणि स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक होत आहे.

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्य मार्गदर्शन व पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था, चांदा (ब्रह्मपुरी)च्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त मार्गदर्शनपर कार्यक्रम व पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे नुकतेच आयोजन राजीव गांधी सभागृहात करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. देवेश कांबळे तर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व प्रकाशक म्हणून ज्येष्ठ लेखक, विचारवंत तथा शिवराज विद्या संकुल, गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूरचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे पाटील, क्रांतिदेवी कुराडे, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेश कांबळे, ब्रह्मपुरीचे नगराध्यक्ष योगेश मिसार, प्रा. संजय मगर, रिमा कांबळे, प्रा.डॉ. स्निग्धा कांबळे, अनिताताई रामटेके, राजकुमारजी शेंडे, नगरसेवक मोंटूभाऊ पिलारे, पुष्पांकर बांगरे, नगरसेविका सपना बल्लारपुरे, माधुरी उपासे, रेणुताई ठेंगरी, रंजनाताई बुराडे, जयश्रीताई भुते, हेमलता सिंहगडे, पुष्पलता पोपटे विचारमंचावर उपस्थित होते.

या प्रसंगी संस्थेच्या वतीने सर्व मान्यवरांचा व पाहुण्याचा यथोचित सत्कार केला. प्रा. किसनराव कुराडे यांनी देखील शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना तथा नवोदित लेखकांना सन्मानित केले. या सोहळ्यात महाविद्यालयाचा विद्यार्थी युवा लेखक आदित्य राजकुमार बोरकर लिखित 'भारतातील गुलामगिरी : काल, आज, उद्या' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. तुफान अवताडे व प्रा. वसुधा देवगडे यांनी तर आभार प्रा. डॉ. स्निग्धा कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमास संस्थेद्वारा संचालित सर्व शाखांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ... QUOTES ...

"Success in not final, failure is not fatal; it's the courage to continue that counts. Believe you can and you are halfway there."
- Unknown

### चारोळी

काहूर ठेवशील डोक्यात तर
खाल्लं अन्न अंगाला लागत नाही...
ऊतू गेलेलं दूध पिऊन,
शेगडी धष्टपुष्ट कधी होत नाही...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# गोसेखुर्द उजव्या कालव्याचे पाणी सोडा - प्रा. बगमारे

ब्रम्हपुरी/का.प्र.

या वर्षी नैऋत्य ईशान्य मोसमी वाऱ्यांनी सुरुवातीलाच पाठ दाखवली म्हणजे रोहणी आणि मृग हे दोन नक्षत्र कोरडी गेली आणि आद्रा नक्षत्रामध्ये बऱ्यापैकी पाऊस झाला. या कालावधीच्या पावसानंतर पुन्हा एकदा पावसामध्ये मोठा खंड पडलेला आहे. धूळपेरणी केलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची आणि नंतरच्या काळात पेरणी केलेल्या पिकांची अवस्था फारच गंभीर आहे आणि यामुळे येत्या तीन–चार दिवसात कॅनलला पाणी सोडण्यात यावे. अन्यथा दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यावर येऊ शकते.

ही नामुष्कीची वेळ टाळण्यासाठी शेतकऱ्यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी गोसीखुर्द उजवा कालवा यांना प्रा प्रकाश बगमारे यांनी निवेदन दिले आणि जर चार-पाच दिवसात पाणी सोडण्याचे नियोजन झाले नाही तर भविष्यात प्रश्न अधिक गंभीर होईल असा इशारा दिला. अधिकारी मडावी साहेब यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याशी संपर्क साधून यातून मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी ईश्वर पिलारे, रामभाऊ कावडे, सौरभ सहारे, मधुकर सहारे, शांताराम सहारे, मुखरू बोरघरे, केशव करंबे, ज्ञानेश्वर बोरघरे, जगदीश उईके, जनार्दन मसराम, अशोक भुपाल, शामराव पिलारे उपस्थित होते.

# एलएमबी स्कुलमध्ये 'गार्डन एक्सप्लोरर' उपक्रम



ब्रम्हपुरी/का.प्र.

पर्यावरणाबाबत विद्यार्थ्यामध्ये जागरूकता निर्माण करणे निसर्गाशी त्यांचे नाते दृढ करणे तसेच सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे या उद्देशाने दि ११ जुलै २०२६ रोजी एलएमबी पब्लिक स्कुलच्या प्रि-स्कुल विभागात 'गार्डन एक्सप्लोरर' या उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेच्या बागेतील विविध, झाडे, फुले, वनस्पती तसेच विविध कीटकांचे निरीक्षण केले. शिक्षिकानी मुलांना पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता आणि निसर्गातील प्रत्येक सजीवाचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना फुलपाखरू, टोळ, मधमाशी, लेडीबग, मुंगी आदि विविध कीटकांविषयी रंजक माहिती देण्यात आली. त्यांची भूमिका विद्यार्थ्यांना सोप्या व मनोरंजक पध्दतीने समजावून सांगण्यात आली.

उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे वापरून झालेल्या बिसलेरीच्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा पुनर्वापर Best out of Waste करून आकर्षक फुलपाखरू (Butterfly) टोळ (Grasshopper) आणि लेडिबग (Ladybug) यांच्या सुंदर प्रतिकृती तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुनर्वापराचे महत्त्व, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि कचरा व्यवस्थापनांचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी कल्पकतेने रंगीबेरंगी व आकर्षक कलाकृती तयार करून आपल्या सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार सादर केला. या उपक्रमात प्री-स्कूल विभागातील सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्याकडून ही संपूर्ण कृती हसत-खेळत आणि आनंददायी वातावरणात करून घेतली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिकत शिकत आनंद घेत उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या यशस्वी उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर तसेच उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रेरणा लाभली. त्यांच्या नेतृत्वामुळे उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होऊन विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षणाची उत्कृष्ट संधी मिळाली.

# ब्रम्हपुरीत १०० टक्के शाळा बंद आंदोलन यशस्वी




ब्रह्मपुरी/का.प्र.

'शिक्षक हा राष्ट्राचा कणा आहे, शिक्षकांमुळेच देशाच्या भावी पिढ्या घडतात. परंतु, आज याच शिक्षकांवर 'आम्हाला आधी विद्यार्थ्यांना शिकवू द्या' अशी विनवणी करण्याची वेळ आली आहे,' अशा संतप्त भावना व्यक्त करत ब्रह्मपुरी तालुक्यातील शिक्षक संघटनांनी सरकारी धोरणांवर तीव्र ताशेरे ओढले आहेत. शासनाचे जाचक नियम, प्रशासनाचे तुघलकी निर्णय आणि अशैक्षणिक कामांच्या प्रचंड ओझ्याविरोधात महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती प्राथमिक शिक्षक संघटनेच्या हाकेला प्रतिसाद देत ब्रह्मपुरी तालुका प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने १०० टक्के 'शाळा बंद' आंदोलन पुकारून प्रशासनाला हादरवून सोडले.

शिक्षकांचे मूळ काम विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे हे असताना, शासनाने शिक्षकांना विविध अशैक्षणिक कामांच्या विळख्यात अडकवून ठेवले आहे, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. बी.एल.ओ. (BLO), 'एसआयआर' (SIR) यांसारख्या अशैक्षणिक कामांमुळे शिक्षकांचा मुख्य वेळ कागदोपत्री घोळात आणि सर्वेक्षणात जात असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला सर्वस्वी शासनच जबाबदार असल्याचा घणाघात शिक्षकांनी केला. 'आधीच शिक्षकांची कमतरता, त्यात कामांचा डोंगर' अशा धोरणांमुळे शाळा चालवायच्या की सरकारी योजनांचे फॉर्म भरायचे? असा रोखठोक सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

शिक्षकांवर लादण्यात आलेल्या जाचक अटींमधून सुटका व्हावी, यासाठी ब्रह्मपुरी तालुक्यातील प्रमुख शासकीय अधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र शासनाकडे मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. मध्यवर्ती प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुरेश बुराडे, सचिव योगराज बोरकुटे, कोषाध्यक्ष संजय सोनकुसरे, तसेच देवानंद तुळकाने, नरेश ठक्कर, भाविक सुखदेवे, प्रल्हाद पाल आणि उषाताई ढोके यांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्व शिक्षकांनी आंदोलनात सहभाग घेतला.


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# इंजिनचा कबाडा, मायलेजचा फज्जा...

(पान क्र. १ वरून)

१२.६८ रुपये, मिश्रित पेट्रोलची खरी किंमत १ लिटर १०१.७४ रुपये (फार तर १०२ ते १०३ रु.) ग्राहकांकडून मात्र १ लिटरसाठी पूर्ण ११२ रुपये वसूल केले जात आहेत. म्हणजेच, वाहनधारकांना प्रतिलिटर ९ ते १० रुपयांचा थेट भुर्दंड सहन करावा लागत आहे. ग्राहकांच्या हक्काचा हा पैसा कोणाच्या खिशात जात आहे, याचे उत्तर सरकार द्यायला तयार नाही.

देशात विकल्या जाणाऱ्या २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोलमुळे वाहनधारकांचे कंबरडे मोडले आहे. स्थानिक मोटार मेकॅनिक आणि तज्ज्ञांच्या मते, हा सरळ सरळ तिहेरी तोटा आहे. इथेनॉल हे निसर्गतः संक्षारक असल्यामुळे इंधन पुरवठा करणाऱ्या रबरी नळया, प्लास्टिकचे भाग आणि सील्स वितळू लागल्या आहेत किंवा कडक होऊन निकामी होत आहेत. गेल्या चार वर्षांपूर्वीची वाहने केवळ शुद्ध पेट्रोलसाठी डिझाइन केलेली आहेत, त्यामुळे जुन्या गाड्यांचे इंजिन यात तग धरू शकत नाहीत. इथेनॉल हवेतील पाणी शोषून घेते. यामुळे इंधनाच्या टाकीत पाणी साचून टाकीला आतून गंज लागणे, इंधन पंप (Fuel Pump) खराब होणे अशा गंभीर तक्रारी वाढल्या आहेत. इथेनॉलची ऊर्जा निर्मिती क्षमता पेट्रोलपेक्षा कमी असल्याने वाहनांचे मायलेज थेट ४ ते ८ टक्क्यांनी घटले आहे. खुद्द केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनीही या मायलेज घटण्याला दुजोरा दिला आहे. दुर्दैव असे की, वाहन कंपन्यांनी अद्याप आम्ही 'इथेनॉल अनुकूल' इंजिन बनवले आहे असा कोणताही अधिकृत दावा केलेला नाही आणि शासकीय अधिकारीही मौन बाळगून आहेत.

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404